माहे एप्रिल-२०२० ते जून-२०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ८ नगर परिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी **सुधरित प्रभाग रचना**, आरक्षण व **सोडतीचा कार्यक्रम-२०२०**

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक प्राथम्य**

क्रमांक रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.१२/का.०६,
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १०/०२/२०२०.

प्रति,

जिल्हाधिकारी,
**ठाणे, पुणे, जळगाव, नांदेड व नागपूर.**

**विषय:- माहे एप्रिल-२०२० ते जून-२०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या ८ नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सुधारित प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम-२०२०.**

संदर्भ:- १) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.७ (२)/का-६, दि.२४/०७/२०१५ चे आदेश.
२) आयोगाचे समक्रमांकाचे दि.०६/०१/२०२० रोजीचे पत्र.
३) आयोगाचे समक्रमांकाचे दि.२३/०१/२०२० रोजीचे पत्र.
४) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश-२०२० दि.२७/०१/२०२०.
५) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१/का-६, दि.०६/०२/२०२० चे आदेश.
६) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१-अ/का-६, दि.०६/०२/२०२० चे आदेश.

महोदय/महोदया,

माहे एप्रिल-२०२० ते जून-२०२० या कालावधीमध्ये मुदत संपुष्टात येणाऱ्या आपल्या जिल्ह्यातील **अंबरनाथ**, **कुळगाव-बदलापूर**, राजगुरुनगर, **भडगाव**, **वरणगाव**, **भोकर**, **मोवाड** व **वाडी** या ८ नगर परिषदांच्या सार्वत्रिक निवडणुका अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांची मुदत संपण्यापूर्वी घेणे आवश्यक आहे. राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधीन क्र. ३ च्या पत्रान्वये ८ नगर परिषदांच्या बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार घ्यावयाच्या सोडतीची प्रक्रिया स्थगित केली होती. शासनाने संदर्भाधीन क्र. ४ अन्वये नगरपरिषदांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पध्दतीऐवजी एक सदस्यीय प्रभाग पध्दती लागू करण्याबाबतचा अध्यादेश क्र.१, दिनांक २७/०१/२०२० रोजी प्रख्यापित केला आहे. यास अनुसरुन राज्य निवडणूक आयोगाचा दिनांक ०६/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्याक्रम-२०२० रद्द करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ९ (२) मधील तरतुदींनुसार उपरोक्त नगर परिषदांची सदस्य संख्या संबंधीत विभागीय आयुक्त यांनी शासन राजपत्रात प्रसिध्द केली आहे.

३. आणि ज्याअर्थी, शासनाने दिनांक २७/०१/२०२० महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश-२०२०, (सन २०२० चा अध्यादेश क्रमांक १) अन्वये नगरपरिषदांमध्ये बहुसदस्यीय प्रभाग पध्दती ऐवजी एक सदस्यीय प्रभाग पध्दती लागू केली आहे. त्या अनुषंगाने आयोगाने नगर परिषदा/नगरपंचायतींच्या प्रभाग रचनेबाबतचे सुधारित आदेश दिनांक ०६/०२/२०२० रोजी पारित केले असून आता त्यानुसार प्रभाग रचना तयार करावी.

४. आरक्षण चक्रानुक्रमे फिरविण्याकरिता मागील निवडणुकांमधील आरक्षणाची निश्चिती राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१/का-६,दि.०६/०२/२०२० मधील आदेशातील परिच्छेद ५ मधील तरतुदीनुसार करण्यात यावी.

i) ज्या नगरपरिषदांच्या मागील सार्वत्रिक निवडणुका या एक सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार जर सलग तीन वेळा झालेल्या असतील तर त्यांनी सन-२०२० च्या निवडणुकीसाठी यथास्थिती सन-२००५, २०१० व सन-२०१५ मधील आरक्षण विचारात घ्यावे. त्यानुसारच या निवडणुकीमध्ये आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे आवश्यक आहे.

ii) ज्या नगरपरिषदांच्या मागील सार्वत्रिक निवडणुका या एक सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार सलग दोन वेळा झालेल्या असतील त्यांनी सन-२०२० च्या निवडणुकीसाठी यथास्थिती सन-२०१० व सन-२०१५ मधील आरक्षण विचारात घ्यावे. त्यानुसारच या निवडणुकीमध्ये आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे आवश्यक आहे.

iii) ज्या नगरपरिषदांची मागील सार्वत्रिक निवडणूक ही एक सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार एक वेळा झाली असेल त्यांनी सन-२०२० च्या निवडणुकीसाठी यथास्थिती सन-२०१५ मधील आरक्षण विचारात घ्यावे. त्यानुसारच या निवडणुकीमध्ये आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे आवश्यक आहे.

५. **भडगाव** नगरपरिषदेची सार्वत्रिक निवडणूक २०१५ मध्ये बहुसदस्यीय प्रभाग पध्दती नुसार घेण्यात आलेली असल्यामुळे माहे एप्रिल-२०२० मध्ये होणारी सार्वत्रिक निवडणूक ही पहिली निवडणूक समजण्यात यावी. त्यानुसार आरक्षण निश्चित करण्यात यावे.

६. आता या पत्राद्वारे माहे एप्रिल-२०२० ते जून-२०२० या कालावधीत मुदती संपणाऱ्या नगर परिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा सुधारित कार्यक्रम खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

i) **"अ"** वर्ग नगरपरिषदा **परिशिष्ट-१** नुसार

ii) **"ब"** वर्ग नगरपरिषदा **परिशिष्ट-२** नुसार

iii) **"क"** वर्ग नगरपरिषदा **परिशिष्ट-३** नुसार

**प्रभाग रचनेसाठी आवश्यक असलेले आदेश/परिपत्रक राज्य निवडणूक आयोगाच्या https://www.mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.**

७. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१-अ/का.६, दि.०६/०२/२०२० अन्वये प्रभाग रचना अंतिम करण्याबाबत अधिकार प्रदान करण्यात आलेले असून त्यानुसार संबंधितांनी कार्यवाही करणे आवश्यक राहिल.

८. प्रभाग रचनेचे तीन मुख्य टप्पे राहणार आहेत:-

(अ) आरक्षणासह प्रारुप प्रभाग रचना करणे,

(ब) हरकती व सूचनांवरील सुनावणी घेणे व

(क) अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करणे.

९. **प्रभाग रचना करताना प्रामुख्याने खालील बाबींवर लक्ष देणे आवश्यक आहे :-**

(i) **राज्य निवडणूक आयोगाकडे आपणाकडून प्राप्त झालेल्या माहिती नुसार परिशिष्ट-४** मध्ये नमूद केलेल्या एकूण ८ नगर परिषदांची मुदत माहे एप्रिल-२०२० ते जून-२०२० या कालावधीमध्ये संपुष्टात येणार आहे. याबाबत आपल्या स्तरावर पुन्हा खात्री करण्यात यावी. त्यामध्ये त्रुटी/तफावत असल्यास ती राज्य निवडणूक आयोगास तात्काळ कळविण्यात यावी. वरील कालावधीत

मुदत संपणाऱ्या एकाही नगर परिषदेची निवडणूक तिची मुदत संपण्यापूर्वी न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

(ii) या निवडणुकांकरिता जनगणना कार्यालयाची सन २०११ च्या जनगणनेची आकडेवारी वापरण्यात यावी.

(iii) प्रभाग रचना करताना गुगल मॅप वापरुन, त्यावर प्रगणक गट दर्शविण्यात यावेत.

(iv) मुख्याधिकारी यांनी अनुसूचित जातीच्या/अनुसूचित जमातीच्या आरक्षणासह प्रारूप प्रभाग रचना प्रस्ताव तयार करावा.

(v) अनुसूचित जाती मधील महिला, अनुसूचित जमातीमधील महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील महिला व सर्वसाधारण महिला याकरिता सोडत, जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या कार्यक्रमानुसार काढावी. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी एकच पद देय असल्यास याबाबत आयोगाच्या प्रभाग रचनेच्या **दि.०६/०२/२०२०** च्या आदेशातील परिच्छेद क्र. ६ मधील तरतुदींनुसार कार्यवाही करावी.

(vi) सोडतीसाठी, फिरणारा पारदर्शक ड्रम/काचेचा बॉक्स वापरावा व त्यामध्ये टाकावयाच्या चिठ्ठयांचा आकार १५ सेंमी x १५ सेंमी पेक्षा जास्त नसावा. चिठ्ठीवरील अनुक्रमांक बाहेरुन दिसणार नाहीत याची दक्षता घ्यावी. त्यावर लावावयाचे रबर बँड एकाच रंगाचे असावेत. शक्य असल्यास सोडतीचे थेट प्रक्षेपण स्थानिक केबल टि.व्ही. वर करावे.

(vii) एक सदस्यीय प्रभाग पध्दतीनुसार प्रभागरचना आणि **आरक्षण** राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रानिआ/नप-२०२०/प्र.क्र.१/का.६, दिनांक ०६/०२/२०२० नुसार करावी. या आदेशानुसार विहित केलेल्या परिशिष्ट १ ते १३ नुसारची माहिती तयार करुन ती सर्व जनतेच्या निदर्शनास आणण्याकरिता आवश्यक ती उपाय योजना करावी.

(viii) सदस्य पदाच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस, रहिवाश्यांच्या माहितीसाठी हरकती व सूचना, अंतिम प्रभाग रचना इत्यादी याकरिता मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी देण्यात यावी. उदा.

(a) स्थानिक वृत्तपत्रे, केबल टी.व्हि. वर

(b) नगर परिषदांच्या प्रभाग समितीचे व इतर कार्यालयातील सूचना फलक,

(c) जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयाचे सूचना फलक

(d) स्थानिक पातळीवर इतर माध्यमे.

(e) जिल्हाधिकारी व नगर परिषदांच्या संकेत स्थळावर इत्यादी

(ix) प्रारूप प्रभाग रचना व अंतिम प्रभाग रचना जिल्हाधिकारी व नगर परिषदांच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.

(x) सोडतीच्यावेळी प्रारुप प्रभाग रचनेचा नकाशा व त्याच्या चतुःसिमा, सोडतीसाठी येणाऱ्या नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावून ठेवावा.

(xi) सोडत, जिल्हाधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या उपजिल्हाधिकारी दर्जापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली होईल. प्रभाग रचना, आरक्षण व सोडत इत्यादी पासून अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कार्यवाहीवर नियंत्रण ठेवण्याकरीता **उपजिल्हाधिकारी** दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी. सोडतीची रंगीत तालीम फक्त **संबंधीत अधिकारी व कर्मचारी** यांचे उपस्थितीत घ्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

सहपत्र- परिशिष्ट-१ ते ४

प्रत:-

१. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
३. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन,
कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद व नागपूर.
४. संबंधित नगर परिषदांचे मुख्याधिकारी
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी व कार्यासने
६. राज्य निवडणूक आयोगाचे मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई व नागपूर खंडपीठांमध्ये
नेमलेले वकील
७. निवड नस्ती/कार्या.६

# प्रभाग रचना, आरक्षण व सोडत कार्यक्रम

## परिशिष्ट -१ ( "अ" वर्ग नगरपरिषदांसाठी )

माहे एप्रिल-२०२० ते जून-२०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या नगरपरिषदांसाठी
प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा सुधारित कार्यक्रम -२०२०.

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.१२/का-०६, दि. १०/०२/२०२० सोबतचे परिशिष्ट.)

| अ. क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप प्रभाग रचना आरक्षणासह** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (नगर परिषदांच्या प्रभागांची संख्या, त्यांची प्रभागनिहाय एकूण व अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमातीची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या, क्षेत्र, सीमांकन, नकाशा, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आरक्षण यासह) **जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य निवडणूक आयुक्त यांचेकडे सादर करणे** | मुख्याधिकारी | १३/०२/२०२० (गुरुवार) (पर्यंत) |
| २. | प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देणे. | राज्य निवडणूक आयुक्त | १५/०२/२०२० (शनिवार) (पर्यंत) |
| ३. | सदस्य पदांच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस प्रसिध्द करणे **(जिल्हाधिकारी व नगर परिषदांच्या वेबसाईटसह)** | जिल्हाधिकारी | १७/०२/२०२० (सोमवार) |
| ४. | नगर परिषदांच्या सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत काढणे. (अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील महिला तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिला) | मुख्याधिकारी | १८/०२/२०२० (मंगळवार) |
| | **ब) हरकती व सूचना तसेच सुनावणी** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे व सदस्य पदांच्या आरक्षणाची अधिसूचना (कलम १० नुसार) रहिवाश्यांच्या माहितीसाठी व हरकती तसेच सूचना मागविणेकरिता वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगर परिषदांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | २०/०२/२०२० (गुरुवार) पर्यंत |
| २. | हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी | | २०/०२/२०२० (गुरुवार) ते २६/०२/२०२० (बुधवार) पर्यंत |
| ३. | प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देणे. | जिल्हाधिकारी | २९/०२/२०२० (शनिवार) पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | हरकती व सूचनांच्या अनुषंगाने अभिप्राय देऊन राज्य निवडणूक आयुक्त यांचेकडे अहवाल पाठविणे | जिल्हाधिकारी | ०४/०३/२०२० (बुधवार) पर्यंत |
| ५. | अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे. | राज्य निवडणूक आयुक्त | ११/०३/२०२० (बुधवार) पर्यंत |
| **क) अंतिम प्रभाग रचना<br>(प्रभाग निहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या तसेच आरक्षणासह)** | | | |
| १. | अधिनियमातील कलम १० नुसार अंतिम अधिसूचना वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगर परिषदांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | १३/०३/२०२० (शुक्रवार) पर्यंत |

**टीपः- प्रत्येक नगर परिषदांची प्रभाग रचना, आरक्षण व सोडत इत्यादी ते अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कामावर नियंत्रण ठेवण्याकरीता जिल्हाधिकारी यांनी उप जिल्हाधिकारीपेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी.**

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

# प्रभाग रचना, आरक्षण व सोडत कार्यक्रम

## परिशिष्ट-२ ("ब" वर्ग नगरपरिषदांसाठी)

**माहे एप्रिल-२०२० ते जून-२०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या नगरपरिषदांसाठी**
**प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा सुधारित कार्यक्रम -२०२०.**

**(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र. रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.१२/का-०६, दि. १०/०२/२०२० सोबतचे परिशिष्ट.)**

| अ. क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप प्रभाग रचना आरक्षणासह** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (नगर परिषदांच्या प्रभागांची संख्या, त्यांची प्रभागनिहाय एकूण व अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमातीची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या, क्षेत्र, सीमांकन, नकाशा, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आरक्षण यासह) जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे | मुख्याधिकारी | १३/०२/२०२० (गुरुवार) (पर्यंत) |
| २. | प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देणे. | जिल्हाधिकारी | १५/०२/२०२० (शनिवार) (पर्यंत) |
| ३. | सदस्य पदांच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस प्रसिध्द करणे **(जिल्हाधिकारी व नगर परिषदांच्या वेबसाईटसह)** | जिल्हाधिकारी | १७/०२/२०२० (सोमवार) |
| ४. | नगर परिषदांच्या सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत काढणे. (अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील महिला तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिला) | मुख्याधिकारी | १८/०२/२०२० (मंगळवार) |
| | **ब) हरकती व सूचना तसेच सुनावणी** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे व सदस्य पदांच्या आरक्षणाची अधिसूचना (कलम १० नुसार) रहिवाश्यांच्या माहितीसाठी व हरकती तसेच सूचना मागविणेकरिता वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगर परिषदांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | २०/०२/२०२० (गुरुवार) पर्यंत |
| २. | हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी | | २०/०२/२०२० (गुरुवार) ते २६/०२/२०२० (बुधवार) पर्यंत |
| ३. | प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देणे. | जिल्हाधिकारी | २९/०२/२०२० (शनिवार) पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | हरकती व सूचनांच्या अनुषंगाने अभिप्राय देऊन राज्य निवडणूक आयुक्त यांचेकडे अहवाल पाठविणे | जिल्हाधिकारी | ०४/०३/२०२० (बुधवार) पर्यंत |
| ५. | अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे. | राज्य निवडणूक आयुक्त | ११/०३/२०२० (बुधवार) पर्यंत |
| **क) अंतिम प्रभाग रचना (प्रभाग निहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या तसेच आरक्षणासह)** | | | |
| १. | अधिनियमातील कलम १० नुसार अंतिम अधिसूचना वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगर परिषदांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | १३/०३/२०२० (शुक्रवार) पर्यंत |

**टीपः- प्रत्येक नगर परिषदांची प्रभाग रचना, आरक्षण व सोडत इत्यादी ते अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कामावर नियंत्रण ठेवण्याकरीता जिल्हाधिकारी यांनी उप जिल्हाधिकारीपेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी.**

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

# प्रभाग रचना, आरक्षण व सोडत कार्यक्रम

## परिशिष्ट-३ ( "क" वर्ग नगरपरिषदांसाठी )

**माहे एप्रिल-२०२० ते जून-२०२० या कालावधीत मुदत संपणाऱ्या नगरपरिषदांसाठी**
**प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा सुधारित कार्यक्रम -२०२०.**

**(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.१२/का-०६, दि. १०/०२/२०२० सोबतचे परिशिष्ट.)**

| अ. क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | **अ) प्रारुप प्रभाग रचना आरक्षणासह** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव (नगर परिषदांच्या प्रभागांची संख्या, त्यांची प्रभागनिहाय एकूण व अनुसूचित जाती तसेच अनुसूचित जमातीची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या, क्षेत्र, सीमांकन, नकाशा, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आरक्षण यासह) जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करणे | मुख्याधिकारी | १३/०२/२०२० (गुरुवार) (पर्यंत) |
| २. | प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देणे. | जिल्हाधिकारी | १५/०२/२०२० (शनिवार) (पर्यंत) |
| ३. | सदस्य पदांच्या आरक्षणाच्या सोडतीकरिता नोटीस प्रसिध्द करणे **(जिल्हाधिकारी व नगर परिषदांच्या वेबसाईटसह)** | जिल्हाधिकारी | १७/०२/२०२० (सोमवार) |
| ४. | नगर परिषदांच्या सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत काढणे. (अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीमधील महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील महिला तसेच सर्वसाधारण प्रवर्गातील महिला) | मुख्याधिकारी | १८/०२/२०२० (मंगळवार) |
| | **ब) हरकती व सूचना तसेच सुनावणी** | | |
| १. | प्रारुप प्रभाग रचना, प्रभागदर्शक नकाशे व सदस्य पदांच्या आरक्षणाची अधिसूचना (कलम १० नुसार) रहिवाश्यांच्या माहितीसाठी व हरकती तसेच सूचना मागविणेकरिता वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगर परिषदांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | २०/०२/२०२० (गुरुवार) पर्यंत |
| २. | हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी | | २०/०२/२०२० (गुरुवार) ते २६/०२/२०२० (बुधवार) पर्यंत |
| ३. | प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देणे. | जिल्हाधिकारी | २९/०२/२०२० (शनिवार) पर्यंत |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | हरकती व सूचनांच्या अनुषंगाने अभिप्राय देऊन **संबंधित विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन**, यांचेकडे अहवाल पाठविणे | जिल्हाधिकारी | ०४/०३/२०२० (बुधवार) पर्यंत |
| ५. | अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे. | **संबंधित विभागीय आयुक्त** | ११/०३/२०२० (बुधवार) पर्यंत |
| **क) अंतिम प्रभाग रचना (प्रभाग निहाय एकूण लोकसंख्या, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या तसेच आरक्षणासह)** | | | |
| १. | अधिनियमातील कलम १० नुसार अंतिम अधिसूचना वृत्तपत्रात व स्थानिकपातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगर परिषदांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | १३/०३/२०२० (शुक्रवार) पर्यंत |

**टीपः- प्रत्येक नगर परिषदांची प्रभाग रचना, आरक्षण व सोडत इत्यादी ते अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कामावर नियंत्रण ठेवण्याकरीता जिल्हाधिकारी यांनी उप जिल्हाधिकारीपेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी.**

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

# नगर परिषदांची नावे

## परिशिष्ट -४ (सार्वत्रिक निवडणुकांसाठी)

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.१२/का-६, दि. १०/०२/२०२० सोबतचे सहपत्र)

| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | नगर परिषदांचे नाव | नगर परिषदांच्या मुदत समाप्तीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | जळगाव | भडगाव | २९/०४/२०२० |
| २ | नांदेड | भोकर | ०९/०५/२०२० |
| ३ | पुणे | राजगुरुनगर | १५/०५/२०२० |
| ४ | ठाणे | अंबरनाथ | १७/०५/२०२० |
| ५ | ठाणे | कुळगाव-बदलापूर | १७/०५/२०२० |
| ६ | नागपूर | मोवाड | १९/०५/२०२० |
| ७ | नागपूर | वाडी | १९/०५/२०२० |
| ८ | जळगाव | वरणगाव | ०५/०६/२०२० |